1489627/2024/O/O JT-DIR-ROPUNE

I/276463/2024


महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.


जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/युनिसेफ/ई-ऑफीस प्रणालीद्वारे    दिनांक : १६.०२.२०२४

## परिपत्रकः

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सोबत जोडलेल्या यादीमधील संस्था,
पुणे विभाग.

**विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि UNICEF अंतर्गत Youth Engagement & Water Stewardship (YEWS) उपक्रमाला प्रतिसाद न देणा-या संस्था..**

संदर्भ : १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि UNICEF दरम्यान डिसेंबर २०२२ मध्ये झालेला सामंजस्य करार.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र. १७/तंशिसं/युनिसेफ/प्रशिक्षण/२०२३/११४ दिनांक २६.०४.२०२३.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि UNICEF दरम्यान सामंजस्य करारानुसार महाराष्ट्र राज्यातील निवडक १३ जिल्ह्यांमध्ये Youth Engagement & Water Stewardship (YEWS) हा उपक्रम जानेवारी २०२३ पासून राबविण्यात येत आहे. संदर्भ क्रमांक २ मधील कार्यालयीन आदेशान्वये पुणे जिल्ह्यातील तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणा-या २०१ संस्थांमध्ये सदर उपक्रमांतर्गत पर्यावरण संवर्धन व पाणी बचतीच्या दृष्टीने विविध कार्यक्रम राबविणे प्रस्तावित आहे.

याकरिता उपरोक्त कार्यालयीन आदेशामध्ये नमूद सर्व संस्थांनी ग्रीन क्लब शिक्षक समन्वयक (GCFC) निवडणे, संस्थेमध्ये ग्रीन क्लबची स्थापना करणे व जिल्हा नोडल अधिकारी, जिल्हा पुणे यांचे द्वारे आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणे अपेक्षित होते.

पुणे जिल्हा नोडल अधिकारी तथा प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, पुणे यांचेमार्फत दिनांक ०५.०८.२०२३, १९.०८.२०२३ व २७.१०.२०२३ या दिवशी एकूण तीन वेळा प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रत्येक वेळी सर्व संस्थांना ई-मेलद्वारे, गुगल फॉर्मद्वारे, व्हॉट्स ॲप मेसेजेसद्वारे प्रसंगी दूरध्वनीद्वारे सूचित करण्यात आलेले होते. तसेच या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर दोन वेळा परिपत्रक प्रसिध्द करुन ग्रीन क्लब समन्वयकांची नावे जिल्हा नोडल अधिकारी तथा प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, पुणे यांचेकडे सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते.

पुणे जिल्ह्यातील २०१ संस्थांपैकी सोबत जोडलेल्या यादीमधील **१५ संस्थां** जिल्हा नोडल अधिका-यांनी आयोजित केलेल्या एकाही प्रशिक्षणास उपस्थित न राहता अद्यापपर्यंत माहिती सादर केलेली नाही व संस्थेमध्ये ग्रीन क्लबची स्थापना केलेली नाही. यावरून सदर संस्थांची महाराष्ट्र शासनाचा हा उपक्रम राबविण्याबाबत उदासिनता दिसून येत आहे. याबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे.

सोबत जोडलेल्या यादीमधील सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, त्यांनी **श्रीमती शुभांगी शिंदे, पुणे जिल्हा समन्वयक (मोबाईल क्रमांक ९४२२०२८६८२) व डॉ. शिरीष ढोबे, सहायक जिल्हा नोडल अधिकारी (मोबाईल क्रमांक ९४२३४३३६५८)** यांचेशी **तात्काळ** संपर्क साधून उपरोक्त उपक्रमाबाबत माहिती घेऊन आपापल्या संस्थेत राबवावा.

**सोबत : १५ संस्थांची यादी.**

**(मारुती जाधव)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : जिल्हा नोडल अधिकारी (UNICEF) तथा प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, पुणे.

## List of the GCFCs not attended training and not established Green Club

Date 16/02/2024

| Sr. No | Inst Code | Institute Name | GCFC Coordinator Name | GCFC Designation | Status |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 6119 | PIBM- Tirupati Institute of Management, Pune | Prof.Ankush Chalise | Professor | Absent |
| 2 | 6128 | ALLANA INSTITUTE | Dr. Atik Shaikh | Professor | Absent |
| 3 | 6138 | Genba Sopanrao Moze Trust Parvatibai Genba Moze College of Engineering,Wagholi, Pune | Prof. Salim Mulla | Assistant Professor | Absent |
| 4 | 6164 | Psd Shastri Educational Foundation's Asma Institute of Management, Pune | Prof.Ankush Yadav | Assistant Professor | Absent |
| 5 | 6188 | Eagle Education Society's Unique Institute of Management, Pune | Dr.Shardha Thakur | Assistant Professor | Absent |
| 6 | 6196 | RIIM - The Academy School Of Business Management, Pune | Prof. Popat Patil | Assistant Professor | Absent |
| 7 | 6318 | Abhinav Education Society's College of Engineering and Technology (Degree), Wadwadi | Prof. Pooja Appaso Vachkal | Assistant Professor | Absent |
| 8 | 6361 | Vishal Institute of Pharmaceutical Education & Research, Ale, (Alephata), Dist. Pune | Dr. Shankar Dhobale | Professor | Absent |
| 9 | 6498 | Sharadchandra Pawar Institute of Pharmacy,Dhumberwadi, Junnar | Mr. Ajikya Dighe | Lecturer | Absent |
| 10 | 6773 | Akemi Business School, Mulsi, Pune. | Dr. Ashish Vyas | Assistant Professor | Absent |
| 11 | 6823 | Shri.Jain Vidyaparasark Mandal's Rasiklal M. Dhariwal Institute of Pharmceutical Education & Research, Pune. | Prof. Raghunath Raut | Assistant Professor | Absent |
| 12 | 6894 | Shri. Sant Dnyaneshwar Maharaj Shikshan Sanstha | Prof. Mahesh Dilip Sutar | Chairman | Absent |
| 13 | 6916 | Pharate Patil College Of Pharmacy Diploma | Prof. Bhujbal Akshay Eknath | Assistant Professor | Absent |
| 14 | 6925 | Aureole School of Business Management, Pune | Prof. Mrs. Komal Phalke | Academic Faculty coordinator | Absent |
| 15 | 6973 | ASMS Institute of Business Management and Research MCA, Pune | Prof. Sudhir Sitanagre | Assistant Professor | Absent |

**Signed by Maruti Rajaram Jadhav**
**Date: 16-02-2024 18:17:56**
**Reason: Approved**